पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- ०६/१२/२०१९*

## बलात्कार करणाऱ्या आरोपीस ७ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा तसेच ४,०००/-रुपये दंड

=> जिल्हा सत्र न्यायाधीश, गडचिरोली श्री. स्वप्नील खटी यांचा न्यायनिर्णय

दिनांक २०/०१/२०१८ रोजी रात्रीचे ०९:०० वा. दरम्यान फिर्यादी (पिडीत)ही स्वता:चे घरी एकटी झोपुन असतांना आरोपी नामे शामराव मारोती आत्राम, हा पिडीतेच्या घरी जावुन तिला झोपेतुन उठवुन तिच्यासोबत जबरदस्ती करतेवेळी पिडीताने आरडा-ओरडा करण्याच्या प्रयत्न केला असता तिचा तोंड दाबुन तिच्यावर बलात्कार करुन पळुन गेला.

वरील तक्रारावरुन भामरागड पोलीसांनी अप.क्र. ०१/२०१८ कलम ३७६ (१), ४५६ भादवी अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेतले. तपासी अधिकारी पोउपनि एस.आर. काळे पोस्टे भामरागड यांनी तपास पुर्ण करुन आरोपीविरोधात सबळ पुरावा मिळाल्यानंतर दोषारोपपत्र तयार करुन मा. न्यायालयात दाखल केले.

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. स्वप्नील खटी यांनी साक्ष पुरावा तसेच वैद्यकिय अधिकारी यांचे अहवालावरुन व सहायक जिल्हा सरकारी वकील श्री. सचिन कुंभारे यांच्या युक्तिवाद ग्राह्य धरुन आज दिनांक ०५/१२/२०१९ रोजी आरोपी शामराव मारोती आत्राम, वय २६ वर्ष रा. हिंदेवाडा ता. भामरागड जि. गडचिरोली याला दोषी ठरवुन कलम ३७६ (१), ४५६ भादवी मध्ये ७ वर्ष सक्षम कारावास व ४,०००/- रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

सदर प्रकरणात कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन पोनि श्री. प्रकाश तुनकलवार यांनी कामकाज पाहीले आहे.